॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ९ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला, नावीन्यपूर्ण कल्पनांना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'आविष्कार-२०२६' (फेज-१) संशोधन महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी उत्साहात झाले. या महोत्सवात विद्यापीठ प्रशाळांमधील २९८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवित विविध संशोधन प्रकल्प आणि मॉडेल्स सादर केली.

उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, वेगास केमिकलचे संचालक अनिकेत पाटील, उद्योजक अनिल कांकरिया, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. पवित्रा पाटील, डॉ. सुरेखा पालवे, प्राचार्य महेंद्रसिंग रघुवंशी, डॉ. राजेश जवळेकर, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी आणि अधिसभा सदस्य केदारनाथ कवडीवाले, नितीन ठाकूर, वैशाली वराडे, नेहा जोशी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

महोत्सवात कला व मानवविद्या शाखेतील ३४, व्यवस्थापन अभ्यासातील २३, वैद्यकीय व औषधनिर्माणशास्त्रातील ४, विज्ञान शाखेतील ७५, कृषी क्षेत्रातील ४२, तर ऊर्जा व तंत्रज्ञान क्षेत्रातील ११९ मॉडेल्स व पोस्टर्स सादर करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय आणि तांत्रिक समस्यांवर उपाय सुचविणारे नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्प सादर केले. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), पर्यावरण संवर्धन, शेती, वाहतूक व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षितता अशा विविध विषयांचा समावेश होता. नैसर्गिक कचऱ्याचे उपयुक्त संसाधनांमध्ये रूपांतर, बायोमेट्रिक हजेरी प्रणाली, विद्यार्थी सहाय्यक चॅटबॉट, दुहेरी तापीय प्रणाली आणि सौरऊर्जेवर चालणारी यंत्रे यांसारख्या प्रकल्पांनी लक्ष वेधून घेतले.

या प्रकल्पांमधून विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनक्षमता आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपाय शोधण्याची क्षमता प्रदर्शित केली. शाश्वत विकासाच्या संकल्पनांना चालना देणारा हा महोत्सव ठरला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्योजक अनिल कांकरिया यांनी संशोधनासाठी सखोल अभ्यास, निरीक्षण आणि वैज्ञानिक पद्धतीने माहिती संकलन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. शिक्षक, पुस्तके आणि निसर्ग यांच्यापासून ज्ञान मिळते. प्रचंड अभ्यास करा, संशोधन करा आणि निरीक्षणातून नवीन कल्पना विकसित करा. यश मिळविण्याच्या प्रवासात अनेकदा अपयश येते; मात्र प्रयत्न करणे सोडू नका, असे आवाहन त्यांनी केले.

वेगास केमिकलचे संचालक अनिकेत पाटील यांनी 'आविष्कार' या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करत संशोधन आणि नवकल्पनांचे महत्त्व अधोरेखित केले. एक नावीन्यपूर्ण कल्पना जग बदलण्याची क्षमता ठेवते. गुणांमधून विद्यार्थ्यांनी किती शिक्षण घेतले हे दिसते; मात्र प्रश्न उपस्थित करण्याची वृत्ती संशोधनाला जन्म देते. विचारांमध्ये योग्य बदल घडवून आणल्यास उत्तम संशोधक होता येते, असे ते म्हणाले.

समारोप सत्रात प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी आविष्कार म्हणजे संशोधन आणि शोध यांचा संगम असल्याचे सांगितले. राज्यपालांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये आविष्कारचा समावेश असल्याचे नमूद करत त्यांनी स्पर्धेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संदीप भामरे यांनी केले, तर अतिथींचा परिचय प्रा. अमरदीप पाटील यांनी करून दिला. आभार प्रदर्शन सह-समन्वयक प्रा. पवन मेश्राम यांनी केले.

........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ९ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**